**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAR-APR, 2020, VOL- 7/58*

# वर्तमान स्तिथीमध्ये अध्यापना बाबत शिक्षकांची भूमिका व जबाबदारी

**अनुप्रिता बी. देशमुख, Ph.D.**

*प्र. प्राचार्या पी. आर. पाटील कॉलेज ऑफ एज्युकेशन, अमरावती.*

***Abstract***

***सध्या भारतातील शिक्षणाविषयीची सर्वात मोठी आणि मुख्य समस्या आहे ती ग्रामीण शिक्षण व्यवस्था ग्रामीण भागातील विद्यार्थी व शिक्षण दोन्ही घटक शासनाकडून दुर्लक्षित आहेत. सर्व प्रकारचे नवोपक्रम हे शहरी शिक्षणाच्या व्यवस्थेत सुधारणा करण्याकरिता ग्रामीण भारतात ६८% लोकसंख्या हि शिक्षित आहे. म्हणजेच शिक्षण प्रक्रियेकडे जास्तीत जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामीण शिक्षणाची एवढी कमी टक्केवारी या यंत्र व तंत्र युगामध्ये असण्यास बरेचसे कारण आहेत.***

***१) ग्रामीण भागात बहुतेक शाळा शासनाद्वारे चालविली जातात.***

***२) विद्यार्थ्यांची अनुपस्थिती.***

***३) शिक्षकांची अनुपस्थिती.***

***४) ग्रामीण शाळा विकास व्यवस्थापना कुचकामी ठरत आहे.***

***५) नवोपक्रम म्हणा किंवा पारंपरिक अध्यापनाकडून कडून नवनवीन अध्यापन (तंत्रविज्ञानाच्या आधारे) पद्धती स्वीकारण्यात शिक्षकांची अनास्था.***

***६) यासोबतच पालक व स्थानिक जनमानस समुदाय.***

***ग्रामीण भागामध्ये शाळांमध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत जरी असली तरी वाचन क्षमता लेखन क्षमता व तसेच गणितीय समस्या सोडविण्याकरिता***

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

***सक्षम नाहीत. बहुतेक पालकांना शिक्षणाचे महत्व समजले आहे आणि ते गरिबी दूर होण्याचा एक मार्ग आहे हे समजले आहे. परंतु पैश्यांच्या कमतरतेमुळे ते आपल्या पाल्याना खाजगी शाळेत पाठवू शकत नाही. जे पालक पाल्याना खाजगी शाळेत पाठवू शकतात त्यांची शालेय शिक्षणाकडे बघण्याची अनास्था दिसून येते. राहिला प्रश्न खाजगी शाळेमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जे विद्यार्थी शाळेत प्रवेशित होतात त्यांचा व शिक्षणाचा खूप जवळून संबंध येतो. सर्व प्रथम प्रत्येक शिक्षकाला विद्यार्थ्या प्रति प्रेम, जिव्हाळा, आदर, इ. मूल्य शिक्षणाच्या वर्तनातून दिसणे आवश्यक आहे.***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

**सध्या भारतातील शिक्षणाविषयीची सर्वात मोठी आणि मुख्य समस्या आहे ती ग्रामीण शिक्षण व्यवस्था ग्रामीण भागातील विद्यार्थी व शिक्षण दोन्ही घटक शासनाकडून दुर्लक्षित आहेत. सर्व प्रकारचे नवोपक्रम हे शहरी शिक्षणाच्या व्यवस्थेत सुधारणा करण्याकरिता ग्रामीण भारतात ६८% लोकसंख्या हि शिक्षित आहे. म्हणजेच शिक्षण प्रक्रियेकडे जास्तीत जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामीण शिक्षणाची एवढी कमी टक्केवारी या यंत्र व तंत्र युगामध्ये असण्यास बरेचसे कारण आहेत.**

**१) ग्रामीण भागात बहुतेक शाळा शासनाद्वारे चालविली जातात.**

**२) विद्यार्थ्यांची अनुपस्थिती.**

**३) शिक्षकांची अनुपस्थिती.**

**४) ग्रामीण शाळा विकास व्यवस्थापना कुचकामी ठरत आहे.**

**५) नवोपक्रम म्हणा किंवा पारंपरिक अध्यापनाकडून कडून नवनवीन अध्यापन (तंत्रविज्ञानाच्या आधारे) पद्धती स्वीकारण्यात शिक्षकांची अनास्था.**

**६) यासोबतच पालक व स्थानिक जनमानस समुदाय.**

**ग्रामीण भागामध्ये शाळांमध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत जरी असली तरी वाचन क्षमता लेखन क्षमता व तसेच गणितीय समस्या सोडविण्याकरिता सक्षम नाहीत. बहुतेक पालकांना शिक्षणाचे महत्व समजले आहे आणि ते गरिबी दूर होण्याचा एक मार्ग आहे हे समजले आहे. परंतु पैश्यांच्या कमतरतेमुळे ते आपल्या पाल्याना खाजगी शाळेत पाठवू शकत नाही. जे पालक पाल्याना खाजगी शाळेत पाठवू शकतात त्यांची शालेय शिक्षणाकडे बघण्याची अनास्था दिसून येते. राहिला प्रश्न खाजगी शाळेमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जे विद्यार्थी शाळेत प्रवेशित होतात त्यांचा व शिक्षणाचा खूप जवळून संबंध येतो. सर्व प्रथम प्रत्येक शिक्षकाला विद्यार्थ्या प्रति प्रेम, जिव्हाळा, आदर, इ. मूल्य शिक्षणाच्या वर्तनातून दिसणे आवश्यक आहे. आजचा शिक्षक नवीन अध्ययन तसेच नवनवीन अध्यापन तंत्र विकसित करून घ्यायला तसेच उपयोजन करण्याला तयार नाही याचे कारण म्हणजे नवीन ज्ञानाविषयी अनास्था.**

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**प्रस्तुत संशोधनात अकोट शहरातील माँ गायत्री इंग्लिश स्कुल या शाळेतील शिक्षकांची आजच्या वर्तमान स्थितीतील भूमिका व जबाबदारी या विषयी सर्वेक्षण केले.**

**उद्दीष्टे:**

**I) शिक्षकांच्या अध्यापन विषयक अभिवृत्तीचा अभ्यास करणे.**

**II) शिक्षकांची विद्यार्थी प्रति प्रेम, जिव्हाळा, आदर, इ. विषयक मूल्यांचा अभ्यास करणे.**

**III) स्वविषयाचा नवनवे उपक्रमांबाबत शिक्षकांची आवड, जिज्ञासेचा अभ्यास करणे.**

**IV) शालेय प्रशासनाबाबत शिक्षकांच्या जबाबदारीचा अभ्यास करणे.**

**V) अभ्यासक्रम राबविण्याचा पारंपरिक पद्धतीला फाटा देणे.**

**संशोधन परिकल्पना:**

**मेवोपक्रमाच्या माध्यमातून अध्यापन व पद्धती केलेले अध्यापन यामध्ये फरक असतो.**

**गृहीतके:**

**I) परंपरागत अध्यापन हे मर्यादित असते.**

**II) परंपरागत अध्यापनामुळे नवनवीन कौशल्य व स्वजबाबदारीची जाणीव होत नाही.**

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**III) तालुका किंवा ग्रामीण भागातील शिक्षकांना आधुनिक अध्यापन (तंत्रविज्ञान आधारित) पुरेशी माहिती नाही.**

**IV) नवीन पक्रमांच्या माध्यमातून अध्यापन केले असता विद्यार्थ्यांची अभिरुची वाढते व गुणसंपादनात वाढ होते.**

**V) पारंपरिक पद्धतीपेक्षा नवीन तंत्रविज्ञान आधारित अध्यापनामुळे विद्यार्थ्यांप्रती शिक्षकांची नवीन ज्ञान व मूल्ये वृद्धिंगत होण्यास मदत होते व तसेच भूमिकेमध्ये मौलिक बदल तालुका स्तरावरील घडून येतो.**

**व्याप्ती:**

**प्रस्तुत संशोधनासाठी एक खाजगी शाळेची निवड करण्यात आली**.

**मर्यादा:**

**प्रस्तुत संशोधन हे अकोट शहरातील एका खाजगी शाळेतील शिक्षकांपुरतेच मर्यादित होते**.

**संशोधन पद्धती:**

**सर्वेक्षण संशोधन पद्धतीची निवड करण्यात आली**.

**संशोधन साधने:**

**संशोधन समस्येचे स्वरूप व उद्दीष्ठे लक्षात घेता प्रस्तुत संशोधनात माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली देण्यात आली व निरीक्षण तंत्र**.

**संशोधन कार्यपद्धती व माहितीचे संकलन:**

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

अकोट जि. अकोला शहरातील श्री. माँ गायत्री इंग्लिश स्कुल, अकोट. वर्तमान स्तिथीमध्ये अध्यापनाबाबत शिक्षकांची भूमिका व जबाबदारी या विषयी सर्वेक्षण केले असता त्यांना देण्यात आलेल्या प्रश्नावली वरून व त्यांचे केलेल्या निरीक्षणावरून असे निदर्शनास आले कि त्यांचे पारंपरिक अध्यापनावर जास्त कल आहे. आधुनिक तंत्रज्ञान निगडित अध्यापनाची पुरेशी माहिती त्यांना नाही त्यामुळे नवनवीन कौशल्यांची उपयुक्तता होऊ शकत नाही. त्यामुळेच कि काय अध्यापची नवोपक्रम विषयी शिक्षक अनभिज्ञ वाटले. त्यामुळे शिक्षक एका पारंपरिक पद्धतीला बदलून नवीन तंत्रज्ञान व नवीनपक्रोमांचा उपयोग जर केला तर शिक्षणाच्या भूमिकेत मौलिक बदल होऊ शकतो आणि जबाबदारी पेलण्यास समर्थ होतो.

**संशोधन निष्कर्ष:**

१) पारंपरिक अध्यापनापेक्षा नवोपक्रम किंवा नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेले अध्यापनामुळे शिक्षकांची एक प्रभावी भूमिका ठरू शकते.

२) नवीन कौशल्य विकसित होऊन जबाबदारी पूर्ण अध्यापन कार्य घडून येऊ शकते.

३) नवोपक्रम किंवा नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने कार्य प्रवीणता शिक्षणामध्ये येऊ शकते तसेच शालेय उपक्रमांमध्ये सुद्धा नवीन ज्ञानाचा वापर करू शकतात. तसेच शाळा व तेथील वातावरण आपलेसे करण्यात शिक्षकाला मदत / आनंद मिळतो.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**४) निरीक्षण गृहपाठ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लिहून देणे.**

**५) Technology शाळेमध्ये उपलब्ध असून त्याचा वापर शिक्षक करीत नाहीत हे निदर्शनास आले.**

**६) प्रश्नावली मध्ये तंत्रविज्ञानाचा आपण वापर करता का? असा प्रश्न विचारले असता त्याचे उत्तर काहींने दिले नाही व काहींने ते आम्हाला जमत असे उत्तर दिले.**

**७) शाळा हि शहरी भागात असून ७०% विद्यार्थी हे ग्रामीण भागातून येतात. अकोट शहरातील पालकांची शाळेच्या शिक्षणासंबंधीत उत्सुकता दिसून येत नाही. निरुत्साही आहेत असे दिसून आले. गृहपाठ उपस्थिती अभ्यास याविषयी कळकळ जाणीव मुळीच दिसून येत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी येत. चांगल्या शाळा आणि सोइ असून सुद्धा शिक्षणात मागे अडतात हे दिसून आले. शाळेनी शिक्षकांना प्रत्येक वर्गात प्रोजेक्टर उपलब्ध करून दिले आहे. त्यांना पी.पी.टी. तयार करणे, प्रोजेक्टर चालविणे याचे प्रशिक्षण सुद्धा दिले असून शिक्षक त्यांचा उपयोग करून घेत नाही हे निदर्शनास आले.**

**प्रस्तुत संशोधनाची उपयोगिता:**

**I) तंत्रज्ञानाचा वापर स्वप्रयत्नाने केलेले अध्यापन बराच काळ उपयोगी ठरते.**

**II) स्वप्रयत्नातून मिळणार आनंद बराच काळ टिकतो.**

**III) स्वप्रयत्नातून मिळणार आनंद पुढील अध्यापनाला प्रेरणा देतो.**

**संदर्भ:**

***डॉ. कुंडले, म. बा.- शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र***

***डॉ. मारोती डी. पवार, (संपादक) शिक्षण समीक्षा, मार्च २०१९***

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*